| MHKO070014932014 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.२५५/२०१४</u><br>**सुनिल भुपाल कुरणे आणि इतर**<br>**विरुध्द**<br>**पंडीत रुकाप्पा कुरणे आणि इतर** |
|---|---|

## <u>निशाणी क्र.४५ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे प्रतिवादी क्र.४ श्रीपाल तायाप्पा कुरणे विरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकुम सेट असाईड होणेसाठी आणि त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.४ श्रीपाल तायाप्पा कुरणे हे दि.२५/०२/२०२५ रोजी मयत झाले आहेत. सदरचा दावा वाटणी बाबत असुन सदर कामी मयत पक्षकार यांचे वारस सामील असणे आवश्यक आहे, त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विलंब झालेला आहे. सदर विलंब माफ होवुन वारसांना रेकॉर्डवर घेणेसाठी अर्ज दिलेला आहे. यातील वादी क्र.१ वरील सुनिल हेच सदर प्रकरण पाहत असुन त्यांना त्यांचे वैयक्तीक अडचणी व आजारपणामुळे वकीलांना भेटुन माहिती देणे शक्य झालेले नाही, पुढे सदर प्रकरणी वारसा नोंदीबाबत अनावधानाने विसरुन गेले आहे. सदर प्रकरणाची कागदपत्रे सुनावणी साठी पाहत असता, वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक असलेचे स्पष्ट झाले आहे, त्यामुळे सदरचा अर्ज दिला आहे.

०३. वर नमुद कारणामुळे तसेच घरगुती अडचणी, चरितार्थाच्या अडचणी, कौटुंबीक जबाबदा–या अशा न टाळता येणा–या अडचणीमुळे मयत प्रतिवादी क्र.४ चे वारसांची नांवे वेळेत रेकॉर्डवर घेता आली नाहीत, व वारस रेकॉर्डला घेण्याच्या तांत्रीक बाबीकडे लक्ष राहीलेले नाही, सदरकामी गुणदोषावर निर्णय होणेसाठी झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. वर नमुद प्रमाणे प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर आणणेमध्ये वादी यांनी कोणताही जाणीवपूर्वक निष्काळजीपणा अगर हयगय केलेली नाही, त्यामुळेही विलंब माफ होवुन वारस रेकॉर्डवर घेणेची परवानगी मिळणे आवश्यक आहे.

०४. प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ केलेस कोणाचेही नुकसान होणार नाही, सदरचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ केलेस मे. कोर्टास न्यायदानास मदत होणार आहे व कोर्ट कामाची अनेकता व गुंतागुंत टळणार आहे. याउलट वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ न झालेस वादी यांचे कशानेही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. यामुळेही सदर वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होणे तांत्रीकदृष्टया मयत प्रतिवादी क्र.४ श्रीपाल उर्फ श्रीपती यांचे बाबत झालेले अबेटमेंट सेट असाईड होणे न्यायासाठी अत्यंत आवश्यक व कायदेशीर आहे. सदर प्रकरणातील वाद हा वाटणीच्या दावेबाबत आहे, सदर प्रकरणाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी सदर वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला अबेटमेंट सेट असाईड होणे न्यायाचे व आवश्यक आहे. सबब अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०५. विरुध्द बाजूने प्रतिवादीतर्फे नि.क्र.४७ ला म्हणणे देवुन कथन करण्यात आले आहे की, अर्ज कलम २ मधील मजकुर मान्य व कबुल नाही. वैयक्तीक अडचणी तसेच आजारपणामुळे वकिलांना भेटुन माहिती देणे शक्य झालेले नाही. त्यामुळे वारसा नोंदीबाबत अनावधानाने विसरुन गेले हे कारण कायदेशिर व संयुक्तीक नाही. अर्ज कलम ३ मधील मजकुर वादीला घरगुती अडचणी, चरितार्थाच्या अडचणी, कौटुंबीक जबाबदारी ही कारणे वारस रेकॉर्डवर घेणेकरीता विलंब झाला या कारणावरुन विलंब माफ करता येणार नाही. सदरच्या नि.४५ च्या अर्जामध्ये २१२ दिवसांच्या विलंबाबाबत कोणतेही कायदेशीर कारण दिलेले नाही. प्रतिवादी क्र.४ श्रीपाल कुरणे यांचे वादी क्र.१ सुनिल भुपाल कुरणे हा पुतण्या आहे. वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.४ यांचे जवळचे नातेसंबंध असल्याने वादी यांना प्रतिवादी क्र.४ मयत असलेबाबतची माहिती होती. सदर नि.क्र.४५ च्या अर्जामध्ये कोणतेही कायदेशीर कारण विलंब माफ करणेबाबत दिलेले नाही. वरील कारणांचा विचार करुन नि.क्र.४५ चा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०६. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप आणि कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादी नं.४ चे वारस म्हणून त्यांचे विरुध्द दावा चालविणेचा अधिकार असलेने दावेत त्यांना रेकॉर्डवर घेणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा गुणदोषावर

निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. वादीतर्फे नि.क्र.४४ ला प्रतिवादी क्र.४ चे मृत्यू प्रमाणपत्र हे दाखल करण्यात आलेले आहे. त्यावरुन प्रतिवादी क्र.४ हे दि.२५/०२/२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जातील कथन व कारण पाहता प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर होण्यास पात्र आहे. अर्ज दाखल करण्यासाठी झालेला विलंब पाहता सदर अर्जावर कॉस्ट लावणे गरजेचे आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.४५) हा वादी यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.२००/–(रु.दोनशे फक्त) आव्हानित प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.४ यांचे विरुध्द झालेला तांत्रीकदृष्टया अबेटमेंटचा आदेश आणि झालेला विलंब खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2025.11.27 17:44:48 +0530

दि.२७/११/२०२५

जयसिंगपूर.

**(अ. त्रिं. मनगिरे)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 27/11/2025. |
| Judgment/order signed by the PO on | 27/11/2025. |
| Judgment/order uploaded on | 27/11/2025. |